ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख ४ ऑगस्ट, १९५४ | अंक ३०

## विविध माहिती

**बडोद्याचे महाराज कारखाना काढणार**—दिल्लीपासून २० मैलांवर फरीदाबाद येथें एक कारखाना काढण्याचा विचार बडोद्याचे महाराज करीत आहेत. कारखान्याचें भांडवल सुमारें १ कोटी रु. असेल आणि त्यांत एअर–कंडिशनिंग प्लँट्स्, विजेच्या तारा, इत्यादि प्रकारचा माल तयार करण्यांत येणार आहे. अशा प्रकारचा भारतामधील हा पहिलाच कारखाना होईल.

**रशिआला भारताचे प्रतिनिधी**—रशिआमध्यें भरत असलेल्या शेती–प्रदर्शनासाठी भारतीय सरकारच्या अन्न आणि शेतकी खात्यातर्फे दोन प्रतिनिधी जाणार आहेत, असें समजतें. रशिआचे शेतकी मंत्री मि. बेनेडिक्टॉव्ह ह्यांनीं श्री. रफि अहमद किडवाई आणि श्री. पंजाबराव देशमुख ह्यांना आमंत्रणें दिलीं आहेत.

**जमीनधारणेची पहाणी**—शेतीचा व्यवसाय करणाऱ्या लोकांत जमिनीची धारणा कशाप्रकारची आहे तें अजमावण्यासाठी प. बंगाल सरकार राज्यांतील ४,१७६ खेडेगांवांतून नमुन्यादाखल तपासणी करणार आहे. जमिनीची मालकी कबजा, तींत येणारी पिकें, इत्यादि दृष्टीनें तपासणी करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ४८,००० रुपये खर्च येणार असून तो राज्य–सरकार आणि मध्यवर्ती सरकार निम्मेनिम्म वांटून घेणार आहेत.

**अमेरिकन खाण–कामगारांची बँक**—अमेरिकेंतील खाण कामगारांची युनायटेड माइन वर्कर्स ह्या नांवाची संघटना आहे. कामगारांच्या ह्या संघटनेनें आपली स्वतःची बँक काढण्याचें ठरविलें आहे. सध्यां त्यांची एक बँक असून दुसरी चालू बँक विकत घेण्यासाठी वाटाघाटी चालू आहेत. दोन्हीं बँका मिळून एकच बँक करण्यांत येणार असून तिजजवळ सुमारें २२,००,००,००० डॉलर्सच्या ठेवी जमतील असा अंदाज आहे. संकल्पित बँक वाशिंग्टनमधील दुसरी मोठी बँक होईल.

**भारताची तंबाखू चीन घेणार**—१९५३ मध्यें भारतांत झालेल्या तंबाखूपैकीं २,००० मेट्रिक टन तंबाखू चीन खरेदी करणार आहे अशी वार्ता भारताच्या व्यापार व उद्योग खात्याकडे आली आहे. भारतीय तंबाखूसाठी परदेशी बाजारपेठ मिळविण्यासाठी हिंदी प्रतिनिधींचें एक व्यापारी मंडळ सध्यां चीनचा व इतर देशांचा दौरा करीत आहे.

**तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांची कुचंबणा**—अलीकडे तांत्रिक शिक्षण घेण्याकडे लोकांचा कल अधिकाधिक होऊं लागला आहे. पण असें शिक्षण घेऊनहि नौकरी मिळेलच अशी शाश्वति राहिलेली नाहीं. मुंबईमधील उद्योग–विनिमय केंद्रातर्फे, परदेशी शिकून आलेल्या १३ तंत्रज्ञांना नौकऱ्या मिळूं शकल्या नाहींत. त्यांच्यासाठी ४२ कंपन्यांकडे प्रयत्न करण्यांत आले होते.

**सिमेंटची वांटणी**—निर्वासितांसाठी घरें बांधण्यास मदत व्हावी म्हणून भारतीय सरकारनें जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर ह्या तिमाहींत दिल्ली राज्यसरकारला ११,५०० टन आणि पंजाब राज्यसरकारला ९,८०० टन सिमेंट मंजूर केलें आहे. भारताच्या पूर्व भागासाठी ५,१०० टन सिमेंट मंजूर करण्यांत आलें आहे.

**जम्मू प्रांताचें औद्योगिकरण**—जम्मू प्रांतांत उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणण्यासाठी काश्मीर सरकारनें ३ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. हातमागाचे कापसाचें कापड, लोकरीचें कापड, ब्लॅकेटस्, इत्यादि उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करण्यासाठी ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**रशिआला निर्यात होऊं शकणारा माल**—रशिआ आणि पूर्व युरोपांतील राष्ट्रें ह्यांना युद्धोपयोगी माल पाठवूं नये असा निर्बंध पाश्चिमात्य राष्ट्रांनीं घातलेला आहे. ह्या निर्बंधांत मूळ ५०० प्रकारच्या मालाची यादी होती. पण आतां फक्त २०० प्रकारच्या मालावरच निर्बंध ठेवण्यांत आला आहे. नवीन यादीप्रमाणें यंत्रचलित नांगर, कापडाची यंत्रसामुग्री, तयार अन्नपदार्थ करण्याची यंत्रें, इत्यादि माल निर्यात करतां येईल.

**पाकिस्तानांतील फिल्मचा धंदा**—पाकिस्तानांतील सिनेमाच्या धंद्याला रोज ३०,००० रुपयांचें नुकसान सोसावें लागत आहे, असें समजतें. परदेशी चित्रपटांविरुद्ध चालू झालेल्या चळवळींत बऱ्याच निर्मात्यांनीं, दिग्दर्शकांनीं आणि नटांनीं भाग घेतल्यामुळें त्यांच्यापैकीं बऱ्याच जणांना अटक करण्यांत आली. त्यामुळें कराची व लाहोरमधील बहुतेक स्टुडिओज बंद आहेत. पाकिस्तानमधील स्टुडिओमधून ३५ चित्रपट काढण्याचें काम चालू होतें.

**चीन–जपान व्यापार**—जपानच्या परदेशीय व्यापार-खात्यानें १·२ कोटी पौंड रेयॉनचा धागा धाडण्यास जपानी व्यापाऱ्यांना परवानगी दिली आहे. ह्या धाग्याला चीनमध्यें येऊं शकणारी किंमत फार कमी असल्याच्या कारणावरून निर्यातीला परवानगी नाकारण्यांत आली होती. पण इटालीनें स्वस्त किंमतींत धागा पुरविण्यास सुरुवात केल्यामुळें जपाननेंहि तसेंच करण्यास प्रारंभ केला आहे.

**इंडोनेशिआंत चित्रपट महोत्सव**—इंडोनेशिआ आणि इतर आशियाई देश ह्यांच्यांतील सांस्कृतिक संबंध वाढविण्याच्या दृष्टीनें चालू वर्षाच्या अखेर जकार्ता येथें एक चित्रपट महोत्सव भरविण्यांत येणार आहे. महोत्सव एक आठवडा चालणार असून चांगल्या चित्रपटांना गुणदर्शक मानचिन्ह देण्यांत येणार आहेत. सिने-तंत्रज्ञ आणि नट ह्यांनाहि महोत्सवासाठी आमंत्रणें करण्यांत आलीं आहेत.

# १९५३ मधील बँकिंग*

बँकिंग कंपन्यांच्या कायद्यासाठी बँकांना रिझर्व्ह बँकेकडे वक्त-शीर तक्ते पाठवावे लागतात, त्यांवर मुख्यतः आधारलेला १९५३ मधील बँकिंगची प्रगति दर्शविणारा आढावा नुकताच रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केला. त्याच्या पाठोपाठ, बँकांच्या ताळेबंदांवर आधारलेलें, बँकांविषयीं आकडेवार माहिती देणारें हें वार्षिक आर्ता प्रसिद्ध होत आहे. ह्या दोन्ही प्रकाशनांनीं मिळून हिंदी बँकिंगवर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे.

प्रस्तुत वार्षिक प्रकाशनांत प्रारंभीं बँकांच्या कारभारासंबंधीं एकत्रित माहिती देणारे तक्ते दिलेले असून, त्यानंतर प्रत्येक बँकेच्या ताळेबंदांतील महत्त्वाच्या बाबींचा तपशील दिलेला आहे. एकाच वर्षापुरते आंकडे न देतां, तुलना करतां येण्यासाठी आधीं-च्या कांहीं वर्षांचेहि आंकडे दिलेले असल्यामुळें, बँकिंगच्या दिशेचा कल स्पष्ट होण्यास चांगली मदत होते. शेडयूल्ड, बिगर–शेडयूल्ड व सहकारी बँकांच्या प्रत्येक राज्यांतील कचेऱ्या दर्शविणारा रंगीत नकाशा जोडलेला असल्यामुळें, राज्यवार प्रगतीची तुलना करणें सोपें जातें. असेच इतर नकाशे व तक्ते ह्यांच्यामुळेंहि प्रस्तुत वार्षिक सुगम्य व आकर्षक झालें आहे.

## ठेवी

भारतांतील जॉइंट स्टॉक बँकांकडील ठेवींत ७ कोटींची वाढ झाली. त्यांपैकीं शेडयूल्ड बँकांकडील ठेवी ६ कोटींनीं व बिगर-शेडयूल्ड बँकांकडील ठेवी १ कोटी रुपयांनीं वाढल्या; पूर्वीच्या वर्षी त्यांच्या ठेवींत ७ कोटींची घट झाली होती. सहकारी बँकां-कडील ठेवींत ११ कोटींची वाढ अनुभवास आली; म्हणजे जॉइंट स्टॉक व सहकारी अशा सर्व बँकांकडील ठेवींपैकीं ११% ठेवी सहकारी बँकांकडे आहेत; १९५२ मध्यें तें प्रमाण १०% होतें.

## भारतांतील कचेऱ्या

बँक कचेऱ्यांची संख्या १९५२ अखेर ३,९७६ होती ती १९५३ अखेर ३९५३ झाली. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ६२ नें घट झाली, तर शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ३९ ची भर पडली. म्हणजे ६२–३९ = २३ इतक्या शाखांची निव्वळ वाढ झाली. सहकारी बँकांच्या कचेऱ्यांत ५७ ची वाढ होऊन त्यांची संख्या ९२६ झाली. बँकांचा फायदा मिळूं शकणाऱ्या १०,४७० लोकसंख्येस एक बँक कचेरी असें प्रमाण पडलें, तर एकूण लोक-संख्येचा विचार करता ७४,१९६ लोकांस एक बँक कचेरी असें प्रमाण पडलें. ५०,००० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येच्या गांवींच शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांपैकी ५५% कचेऱ्या केंद्रित झालेल्या आहेत.

## भारताबाहेरील कचेऱ्या व त्यांचे व्यवहार

भारताबाहेरील कचेऱ्यांत २ची भर पडून त्यांची संख्या १०७ झाली. पाकिस्तानांतील शाखांत ५ची घट झाली तरी इतर ठिकाणीं नव्यानें उघडलेल्या शाखांनीं ती घट भरून काढली, इतकेंच नव्हे तर एकूण संख्या २ नें वाढविली. भारताबाहेरील कचेऱ्यांकडील ठेवी ६८ कोटी रु. झाल्या; म्हणजे त्यांत ८ कोटींची वाढ झाली. दिलेलीं कर्जेंहि ३ कोटींनीं वाढून तीं ३७ कोटी रु. इतकीं झालीं.

* स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिया फॉर दि इअर १९५३. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें प्रकाशन. किं. ६ रु. फक्त परिशिष्टें असलेली संक्षिप्त आवृत्ति किं. १ रु.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई.
शेअर भांडवल व रिझर्व रु. १०,७०,:००
ठेवी .... .... .... रु. ११८५१:४००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,१३,५००
शाखाः- दादर माहीम
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात

शाखाः- बेळगांव पुणें
स्थापना १९१८

## उत्पन्नांत घट, खर्चांत वाढ, निव्वळ नफा कमी

हिंदी शेडयूल्ड बँकांचें उत्पन्न ५ लाखांनीं घटलें तर खर्च १०४ लाखांनीं वाढला. एकूण निव्वळ नफा ९२ लक्ष रुपयांनीं घटला. एक्सचेंज बँकांच्या उत्पन्नांत १५९ लाखांनीं घट झाली, पण त्यांचा व्यवस्थाखर्चहि १९ लाखांनीं उतरून त्यांच्या निव्वळ नफ्यांत १३४ लाखांची घट झाली.

## खर्चाचें उत्पन्नाशीं प्रमाण


चालू व्यवस्थाखर्चाचें चालू उत्पन्नाशीं प्रमाण हिंदी शेडयूल्ड बँकांच्या बाबतींत ७९·८% आणि एक्सचेंज बँकांचे बाबतींत ७७·२% पडलें. १९५२ मध्यें तत्सम प्रमाणें अनुक्रमें ७६·६% व ६९·४% अशीं होतीं. ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ५ लाखां-हून ज्यास्त आहे पण ज्या दुसऱ्या शेडयूलमध्यें दाखल नाहींत अशा बिगर–शेडयूल्ड बँकांचें तत्सम प्रमाण ८०·५% हें कायमच राहिलें.

## पूर्व जर्मनींत भरणारें औद्योगिक प्रदर्शन

पूर्व जर्मनींत लाइपझिग येथें लवकरच भरणाऱ्या प्रदर्शनांत भारतामधील निर्यात-व्यापारी, कारखानदार आणि खाणीमालक आपआपला माल पाठविणार आहेत. भारतामधील कच्चा माल, खनिजें आणि पक्का माल ह्यांना पूर्व जर्मनीची बाजारपेठ खुली करून देण्यासाठी पूर्व जर्मनीचा अधिकारीवर्ग उत्सुक दिसत आहे व त्याच्याकडून भारतीय प्रतिनिधींना पूर्ण सहकार्य मिळत आहे. भारतासाठी जो मंडप उभारण्यांत येत आहे तो बिनखर्च उभार-ण्यांत येत आहे. शिवाय प्रदर्शनासाठीं भारताचे जे प्रतिनिधी-मंडळ येणार आहे त्याच्या खाण्यापिण्याचा खर्चहि प्रदर्शनाचे चालकच करणार आहेत. केवळ ही बाब लक्षांत घेतली तरीसुद्धां भारतीय प्रदर्शकांना येणाऱ्या खर्चात ५ लाख रुपयांची बचत होणार आहे. लाइपझिगमध्यें भरणाऱ्या या प्रदर्शनाला बराच प्राचीन इतिहास आहे. गेलीं ७०० वर्षें हें प्रदर्शन भरत असून प्रदर्शनाची संधि साधून पूर्व युरोप आणि प. युरोप ह्यांच्यांत व्यापारी सौदे करण्याची प्रथा पडलेली आहे. प्रदर्शनांत निरनिराळ्या देशांनीं १००० चौरस मीटर्सपासून २,८०० चौरस मीटर्स इतक्या मोठ्या जागा घेतल्या आहेत. ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, ऑस्ट्रिया, बेल्जम, इत्यादि पाश्चिमात्य देश आणि रशिआ व चीनसारखे पौर्वात्य देश प्रदर्शनांत भाग घेणार आहेत. भारताकडून चहा, कॉफी, मसा-ल्याचे पदार्थ, तंबाखू, तेलें, अभ्रक, इत्यादि कच्चा माल नियमित-पणें घेण्यासाठी दीर्घ मुदतीचे करार करण्याची बहुतेक देशांची इच्छा आहे. त्याशिवाय कापड आणि ग्रामोद्योगांच्या मालाचीहि त्यांना जरूर आहे. ह्या वस्तूंच्या बदला पूर्व युरोपांतील देश भारताला यंत्रसामुग्री, रसायनें व इतर जरूरीचा माल पुरविण्यास तयार आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ४ ऑगस्ट, १९५४


*संस्थापक :*
**प्रो. वामन गोविंद काळे**
*संपादक :*
**श्रीपाद वामन काळे**


## महाराष्ट्रांतील सहकारी साखरकारखाने
### योग्य मार्गदर्शनाची जरूरी

शेतकऱ्यांनीं सहकारी साखरकारखाने काढण्याचें ठरविल्यास, त्यांत भागीदार होऊन त्यांना जरूर ती मदत करण्याचें मुंबई सरकारनें आश्वासन दिल्यापासून जास्तींत जास्त साखरकारखाने काढण्यासाठी महाराष्ट्रांतील बऱ्याच जिल्ह्यांत जणूं कांहीं स्पर्धा सुरू झाल्याचा भास होतो ! वर्तमानपत्रांतील अलीकडच्या बातम्यांवरून अशा तऱ्हेचे १८–२० कारखाने काढण्याचे प्रयत्न निरनिराळया जिल्ह्यांतून सुरू झाल्याचें दिसतें. पुढील ४–५ वर्षांत यांपैकी बरेचसे कारखाने सत्यसृष्टींत येऊं शकले तरी महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रांत — विशेषतः सहकारी क्षेत्रांत — फारच मोठी प्रगति होईल यांत शंका नाहीं. ह्या दृष्टीनें, मुंबई सरकारनें सहकारी साखरकारखान्यांबाबत स्वीकारलेल्या धोरणाचें कोणीहि स्वागतच करील.

एक वेळ अशी होती कीं, सरकारी पाटाखालील क्षेत्रांत अन्न-धान्याऐवजीं उसासारखें पैशाचें पीक काढण्यांत येतें, तेव्हां पाणीपुरवठ्याच्या धरणासारख्या मोठ्या योजनांचा अन्नधान्य-वाढीचे दृष्टीनें व्हावा तसा उपयोग होत नाहीं असें उलटें अनुमान कांहीं जबाबदार गोटांतून काढण्यांत येत असे. जणूं कांहीं ऊंस पिकविणें म्हणजे त्याखालील क्षेत्राचा व पाटाच्या पाण्याचा दुरुपयोग करणें होय ! महाराष्ट्रांत ऊंस पिकविण्याचे व साखरकारखान्याचे दृष्टीनें अत्यंत अनुकूल परिस्थिति आहे असें टॅरिफ बोर्डाच्या व फिस्कल कमिशनच्या अहवालावरून स्पष्ट दिसत असतांनाहि वरील प्रकारची हाकाटी करण्यांत येत असे, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. पण आज ती परिस्थिति पार पालटली आहे. ज्या पिकासाठी महाराष्ट्रांतील जमीन जास्त सोईची आहे त्याच पिकासाठी ती वापरतां येण्याची मोठी शक्यता सरकारी धोरणामुळें निर्माण झाली आहे ही त्यांतल्यात्यांत आनंदाची गोष्ट आहे. सहकारी साखरकारखान्यांस ऊंस पुरविणाऱ्या उत्पादक सभासदाला पाटाखालीं ब्लॉक देण्याची आश्वासनें सरकारकडून दिलीं जात आहेत. पण या बाबतींत, कांहीं विशिष्ट परिस्थितीमुळें, कांहीं थोड्या भाग्यवान शेतकऱ्यांना पाटाच्या पाण्याचे कायमचे हक्क प्राप्त होणार नाहींत अशा वेळींच खबरदारी घेतली जाणें जरूरीचें वाटतें.

कांहीं दिवसांपूर्वी, सहकारी साखर कारखान्यांबाबतच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी कांहीं निमंत्रितांची एक सभा एका शहरांत बोलावण्यांत आली होती; व निमंत्रितांमध्यें फक्त २–४ लोकच ऊंस पिकविणारे शेतकरी होते, असें कळतें !! ही बातमी खरी असल्यास, सहकारी साखरकारखान्यांत कोणास भागीदार होतां येतें, तो मुख्यतः कोणासाठी व कोणी काढावयाचा असतो, यासंबंधींचें संपूर्ण अज्ञान स्पष्ट होतें. अशीच अज्ञानाची परिस्थिति थोड्याफार प्रमाणांत या सर्व प्रयत्नांत दिसून येत आहे. ज्या लोणीच्या प्रवरा सहकारी साखरकारखान्याच्या यशामुळें हें सरकारी धोरण ठरविण्यांत आलें, त्या कारखान्याची संपूर्ण माहिती मिळवून सरकारनें एक खुलासेवार पत्रक सुरवातीसच प्रसिद्ध केलें असतें तर सर्व संबंधी लोकांना व शेतकऱ्यांना तें फार उपयुक्त ठरलें असतें. त्यांच्या अनेक शंका आपोआप नाहींशा झाल्या असत्या. आपण शिरावर घेत असलेली जबाबदारी किती महत्त्वाची आहे व त्याच्या यशापयशाचे काय परिणाम होतील याचीहि त्यांना चांगली जाणीव झाली असती. वास्तविक, मुंबई सरकारनें अशा तऱ्हेचें एक माहितीपत्रक प्रसिद्ध करून सरकारी धोरणाप्रमाणें योग्य त्या ठिकाणीं शक्य तितके कारखाने काढण्यासाठी तज्ज्ञांची एक लहान समिति नेमावयास हवी होती. अशा तऱ्हेची एक समिति मुक्रर करण्याचें सरकारनें आतां जाहीर केलें आहे. निष्फळ प्रयत्न टाळण्याचे दृष्टीनें लोकांचें विनाकारण आर्थिक नुकसान होऊं नये म्हणून आणि सबंध चळवळीस एक पद्धतशीर वळण लागावें याकरितां ही समिति यापूर्वीच सरकारनें नेमणें योग्य झालें असतें असें आम्हांस वाटतें. या दृष्टीनें सरकारनें या प्रश्नाचा तावडतोब विचार करावा आणि सहकारी साखरकारखान्याच्या निरनिराळया अंगोपांगांची व कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देणारें एक सविस्तर पत्रक अधिक वेळ न घालवितां प्रसिद्ध करावें. लोणीच्या सहकारी साखरकारखान्याच्या यशावरून असे सहकारी कारखाने काढणें व ते यशस्वी रीतीनें चालविणें ही फार सोपी गोष्ट आहे अशी कोणाची समजूत झाली असल्यास ती तितकीशी बरोबर नाहीं. तेव्हां, ८–१० कोटी रुपये भांडवलाचे हे साखरकारखाने काढतांना त्यांतील खांचखळग्यांची व अडचणींची संबंधी शेतकऱ्यांना पुरती जाणीव करून द्यावयास पाहिजे. कारण, कमींत कमी १०–१२ लाख रुपयांचें भांडवल न जमल्यास मोठी अडचणीची परिस्थिति निर्माण होईल, अशी साधार भीति वाटते. सहकारी साखरकारखान्यांबद्दल कमी उत्साह वाटत असल्यामुळें आम्हीं ही भीति व्यक्त करीत नसून संभाव्य धोक्याकडे सरकारचें व शेतकऱ्यांचें वेळींच लक्ष वेधण्याच्या एकमेव हेतूनें करीत आहोंत. इतक्या मोठ्या भांडवलाचे इतके कारखाने सहकारी पद्धतीवर चालविण्याकरतां प्रामाणिक, अनुभविक व निस्वार्थी माणसें महाराष्ट्रांत किती मिळूं शकतील हाहि एक महत्त्वाचा प्रश्न असून त्याचाहि विचार वेळींच व्हावा.

या बाबतींत विशेष आनंदाची गोष्ट अशी कीं, मुंबईच्या राज्य सहकारी बँकेनें व प्राध्यापक धनंजयराव गाडगीळ यांनीं पुढाकार घेऊन या सर्व होऊं घातलेल्या सहकारी साखर कारखान्यांचा एक संघ ( फेडरेशन ) निर्माण करण्याचें ठरवून त्याप्रमाणें प्रयत्न सुरू केले आहेत. अगदीं सुरवातीस अशा तऱ्हेचा संघ स्थापन करणें जितकें सोपें आहे तितकेंच तें जरूरीचें आहे. यंत्रसामुग्रीची खरेदी करणें, कारखान्यास लागणारी इतर सामुग्री विकत घेणें, तज्ज्ञ सल्लामसलत देणें, वगैरे बाबतींत नव्या कारखान्यांना या संघाकडून अतिशय उपयुक्त मार्गदर्शन झाल्याशिवाय राहणार नाहीं. सरकारी समिति स्थापन झाली अगर न झाली तरी या संघाला भरीव कामगिरी करतां येईल व तिच्या हातून तो यशस्वी रीत्या पार पडो, असें आम्हीं इच्छितों.

## दि पूना बँकिंग असोसिएशनचा कार्यक्रम

### येत्या ऑक्टोबरमधील बँकिंग परिषद व स्नेहसंमेलन

दि पूना बँकिंग असोसिएशन ही संस्था नागरिकांत, त्याचप्रमाणें बँकिंग क्षेत्रांतील व्यवसायींतहि, बँकिंगच्या ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी स्थापन झालेली आहे, हें आतां सुप्रसिद्धच आहे. ह्या उद्देशास धरून, असोसिएशननें १९५२ मध्यें एक बँकिंग प्रदर्शन भरविलें, त्याचें फारच चांगल्या रीतीनें स्वागत झालें. ह्या प्रदर्शनाचें उद्घाटन शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं केलें व "बँका— काल, आज व उद्यां" ह्या ग्रंथाचें प्रकाशन जाहीर केलें. त्यानंतर डॉ. एस. जी. पाणंदीकर व श्री. डी. एस. सावकार ह्या बँकिंगमधील तज्ज्ञांची व्याख्यानमालाहि गुंफण्यांत आली. श्री. वर्दे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं बँकर्सनीं केलेली चर्चाहि उद्बोधक ठरली. सप्टेंबर, १९५३ मध्यें असोसिएशननें "बँकर्स ॲन्युअल नंबर १९५३" हें सुंदर पुस्तक तयार केलें, त्याचा प्रकाशनसमारंभ श्री. बी. टी. ठाकूर ह्यांच्या हस्तें झाला. त्यांचें स्वतःचें व श्री. डी. फर्मिन ह्यांचें, अशीं दोन अनुभवसिद्ध व माहितीपूर्ण व्याख्यानें ज्यांनीं ऐकलीं, त्यांना आपल्या बँकर्सकडून कशाची अपेक्षा करावी, ह्याचें उत्कृष्ट दिग्दर्शन झालें. श्री. पी. एस. नायक ह्यांच्या अध्यक्षतेखालील चर्चेत पाहुण्यांप्रमाणें इतरहि बहुतेक प्रमुख बँकर्सनीं भाग घेतला.

### अनौपचारिक विचार-विनिमयास प्राधान्य

चालू वर्षी, ऑक्टोबरच्या २ व ३ तारखेस, एक बँकिंग परिषद भरविण्याचा असोसिएशनचा विचार आहे. त्यावेळीं बँकर्सचा एकमेकांचा दृढ परिचय होऊं शकेल व सर्वांच्याच जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर विचारविनिमय करण्याची संधि मिळेल. श्री. वर्दे, प्रा. गाडगीळ, श्री. वैकुंठराय मेहता, इत्यादींच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळविण्याचा असोसिएशन प्रयत्न करील, असें समजतें. चर्चेचा निष्कर्ष संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविला जाईल व त्याला योग्य ती प्रसिद्धीहि दिली जाईल. महाराष्ट्रांतील सर्व बँकांचा पूर्ण तपशील देणारें "महाराष्ट्रांतील बँका" हें पुस्तक त्यासमयीं प्रकाशित केलें जाईल. परिषद् ही पूर्णपणें प्रातिनिधिक स्वरूपाची व्हावी, ह्यासाठी पुणें, सांगली, कोल्हापूर, मिरज, कराड, सातारा, बेळगांव, पनवेल, मालवण, इत्यादि महत्त्वाच्या ठिकाणच्या बँकर्सची एक स्वागत समिति नियुक्त केली जाणार आहे. परिषदेला उपस्थित होणाऱ्या बँकर्सना पुण्याजवळील प्रेक्षणीय स्थळें (उदाहरणार्थ—खडकवासला तलाव, नॅ. के. लॅबोरेटरी, पुणें विद्यापीठ, पर्वती, बंडगार्डन, इत्यादि) दाखविण्याची व्यवस्था केली जाईल व महाराष्ट्रांतील बँकिंग व्यवसायांतील मंडळींना बराच वेळ एकत्र घालवितां येईल अशी योजना करण्यांत येईल. डेक्कन बँक्स असोसिएशन वरील सर्व कार्यक्रमांत सामील होणार असल्याचें तिनें कळविलें आहे. समारंभापूर्वी कांहीं तज्ज्ञांचीं व्याख्यानेंहि केलीं जाणार आहेत. अशा रीतीनें पूना बँकिंग असोसिएशनच्या कार्याचें पाऊल पुढें पडत असून संबंधित व्यक्ती व संस्था ह्यांचा तिला हार्दिक पाठिंबा मिळत आहे, ही अत्यंत उत्तेजनकारक गोष्ट आहे. असोसिएशनचे ऑनररी सेक्रेटरी श्री. गांडेकर प्रभृति कार्यकर्त्यांच्या उत्साही वृत्तीचें व परिश्रमांचें योग्य चीज होईल, असा आम्हांस विश्वास आहे.

---

**प. बंगालमध्यें उद्योगधंदे**—प. बंगालमध्यें ज्या ठिकाणीं निर्वासितांची गर्दी झालेली आहे, त्यांच्या आसपास मोठमोठे उद्योगधंदे काढण्यास उत्तेजन देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. भांडवलापैकी ५० टक्के रक्कम सरकार देणार असून उरलेलें त्या त्या भांडवलदारानें उभें करावयाचें आहे.

## कण आणि क्षण

[ ले. व प्र. श्री. वा. काळे, संपादक अर्थ, दुर्गाविलास, पुणें नं. ४; पृष्ठें १६८, किं. अडीच रु. ]

अर्थ या नियतकालिकाचे संपादक श्री. श्री. वा. काळे यांनीं पुण्याच्या भगिनी मासिकांत लिहिलेल्या तीस फुटकळ लेखांचा हा संग्रह आहे. या पुस्तकाचा विशेष हा कीं, यांतील सर्वच लेख नित्य व्यवहारांतील उपयोगाचे आहेत. उपयुक्त तेंच शिक्षण द्या, सामुदायिक रीत्या सुधारणांचा अवलंब, व्यावहारिक अर्थशास्त्र, विचार करूनच बाजारासाठीं बाहेर पडा, घरगुती नोकरांच्या प्रश्नाचें सत्य स्वरूप, मिळवत्या स्त्रीच्या अडचणी, बोहारणीचीं भांडीं, म्हातारपणची दुर्दशा कशी टाळतां येईल. तुमची कौटुंबिक राहणी तपासून पहा, वगैरे या पुस्तकांतील लेखांचे मथळे देखील या पुस्तकाचें महत्त्व आणि उपयुक्तता चटकन् पटवून देतील. प्रत्येक संसारदक्ष गृहिणीला हें पुस्तक बहुमोल वाटेल. श्री. काळे यांचे विचार व्यवहाराच्या भक्कम पायावर आधारलेले असल्यानें त्यांच्या मताशीं फारच क्वचित कोणाचा मतभेद होऊं शकेल. फॅशन किंवा प्रतिष्ठा यांच्या नादीं न लागतां माणसानें आपल्या उत्पन्नावर लक्ष ठेवूनच त्या प्रमाणांत खर्च बसवावा हा विचार या पुस्तकांत सर्वत्र प्रभावी आहे. पुस्तक साध्या गोष्टीसंबंधींच असलें, तरी अत्यंत उपयुक्त, मार्गदर्शक असून मनोरंजकहि आहे.

*विविधवृत्त, १८-७-५४*

---

### "कण आणि क्षण" चा पुरस्कार

डेक्कन व्ह. ट्रा. सोसायटी (महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभा) पुणें, ह्या संस्थेनें श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ" ह्यांच्या "कण आणि क्षण" ह्या पुस्तकास ३० रु. चें बक्षीस मंजूर केलें आहे. पुस्तकाची दुसरी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली आहे.

---

### भारतांतील वृत्तपत्रांचा व्याप

भारतांत ३३० हून अधिक दैनिकें असून त्यांचा एकूण खप २६ लक्षांचे वर आहे. वृत्तपत्रव्यवसायांत अंदाजें ७ कोटी रुपये भांडवल गुंतलें असून कर्जरूपानें उभारण्यांत आलेलें भांडवल सुमारें ५ कोटी रुपये आहे. या दैनिकांचें वार्षिक उत्पन्न सुमारें ११ कोटी रु. असून त्यांतील ५ कोटी रु. जाहिरातीपासून मिळतात. या व्यवसायांत पगार व मजुरीच्या स्वरूपांत ४ कोटी रु. देण्यांत येतात आणि त्यांतील पत्रकारांचा वांटा ८५ लाख रु. आहे. या वृत्तपत्रांचा निम्म्याहून अधिक खप मोठमोठ्या व राजधान्यांच्या शहरांतून असून ग्रामीण विभागांतील खपाचें प्रमाण अत्यल्पच आहे.

---

### जपानी चित्रपट

जपानमध्यें चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्थांपैकी पांच कंपन्या प्रमुख आहेत. १९५३ मध्यें एकूण ३०२ चित्रपट तयार झाले, त्यांपैकी बहुतेक चित्रपट ह्या पांच कंपन्यांनींच तयार केले. इतर ३५ कंपन्यांनीं मिळून ४० चित्रपट तयार केले. जपानमध्यें ३,९०० सिनेमा थिएटरें आहेत, त्यांपैकीं ९०% थिएटरांतून जपानी चित्रपट दाखविण्यांत येतात. जपानी चित्रपटांचा दर्जा उत्कृष्ट असून त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धांतून वरचे क्रमांक मिळत असल्यानें, त्या चित्रपटांना परदेशी बाजारपेठेहि मिळूं लागली आहे.

## कामगार-विमा कायद्याखाली मिळावयाची वैद्यकीय मदत

### सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नियमांच्या मसुद्यांतील ठळक गोष्टी

मुंबई सरकारनें, १९४८ च्या बॉम्बे स्टेट इन्शुअरन्स ॲक्टान्वयें १९५४ च्या बॉम्बे स्टेट इन्शुअरन्स (मेडिकल बेनिफिट) रुल्सचा मसुदा सरकारी गॅझेटांत नुकताच प्रसिद्ध केला आहे.

### विमेदारांना औषधोपचार

मेडिकल बेनिफिटमध्यें, खास कौशल्याच्या औषधोपचाराखेरीज इतर सर्वसाधारण औषधोपचारांचा समावेश होतो. तसेंच देवी काढणें, रोग-प्रतिबंधक लस टोंचणें, प्रसुतिपूर्व व प्रसूतिनंतर औषधोपचार करणें, मोफत औषधें पुरविणें व ड्रेसिंग करणें, तसेंच आजारीपण, बाळंतपण, नोकरी, जखम आणि मृत्यु याबाबतचीं सर्टिफिकेटें मोफत देणें यांचाहि समावेश होतो.

राज्य सरकार वेळोवेळीं ठरवून देईल त्याप्रमाणें प्रसूतिविषयक वैद्यकीय मदतीची व्यवस्था करण्यांत येईल. तसेंच विमा योजनेंतील वैद्यक व्यवसायींना रोग्याला इस्पितळांत ठेवणें जरूर आहे, असें वाटलें तर त्याचीहि तरतूद या योजनेंत केलेली आहे. इस्पितळांतील औषधोपचारांत सर्वसाधारण व खास अशा औषधोपचारांचा, स्त्रियांच्या प्रसूतींचा आणि खास अशा चिकित्सेचा समावेश होतो. विमेदारांना मोफत इस्पितळांत नेण्यांत येईल.

जी वैद्यकीय यादी तयार करण्यांत यावयाची आहे त्यांत वैद्यक व्यवसायींचा खाजगी पत्ता व त्यांच्या क्लिनिकचा पत्ता देण्यांत येईल. तसेंच तेथें औषधोपचार कोणत्या दिवशीं व कोणत्या वेळांत करण्यांत येईल हेंहि त्या यादींत नमूद करण्यांत येईल. ही यादी विमेदारास, त्यानें मालकाकडे किंवा ट्रेड युनियनकडे अगर मेडिकल ॲसोसिशनकडे तशी मागणी केल्यास मिळूं शकेल.

विमा योजनेंतील वैद्यक व्यवसायी एकाद्या विमेदाराचें नांव आपल्या यादींत समाविष्ट करण्यांत होकार किंवा नकार देऊं शकेल. तसेंच एकाद्या विमेदारासहि त्याची राहण्याची जागा बदलल्यामुळें किंवा इतर कारणासाठी आपला वैद्यक व्यवसायी बदलतां येऊं शकेल. पण त्याला वर्षांतून फक्त एकदाच असा बदल करतां येऊं शकेल. तथापि खास अशी परिस्थिति असेल तर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडिकल ऑफिसरांकडे अर्ज करून केव्हांहि वैद्यक व्यवसायी बदलतां येईल. तसेंच एखादा वैद्यक व्यवसायी विमा योजनेंतून बाहेर पडला किंवा मरण पावला तर अशा प्रसंगीं तात्पुरती व्यवस्था करण्याचीहि तरतूद करण्यांत आली आहे.

जेथें जवळपास विमा योजनेंतील वैद्यक व्यवसायी मिळण्यासारखा नसेल तेथें विमा योजनेखालील दवाखाने सुरू करण्यांत येतील किंवा विमेदाराच्या घराजवळ मध्यवर्ति अशा ठिकाणीं फिरते दवाखाने भेट देतील किंवा त्या भागांतील सरकारी म्युनिसिपालिटीच्या खाजगी इस्पितळांत किंवा दवाखान्यांत वैद्यकीय उपचार करण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

सर्वसाधारण वैद्यकीय उपचार करून घेण्याची कार्यपद्धति पुढीलप्रमाणें आहे:—ज्या वैद्यक व्यवसायींच्या यादींत विमेदाराचें नांव असेल किंवा जो दवाखाना अगर दुसरी एकादी संस्था त्याला नेमून दिली असेल तेथें त्यानें आपलें ओळखपत्र घेऊन जावयाचें व उपचार करून घ्यावयाचे. आणीबाणीच्या प्रसंगीं या योजनेखालील दुसऱ्या वैद्यक व्यवसायींकडे किंवा दवाखान्यांत किंवा संस्थेंत त्याला जातां येईल. विमेदाराला वैद्यक व्यवसायींकडे जाणें शक्य नसेल तेव्हां सदरहू वैद्यक व्यवसायी, विमेदार खरोखरच दवाखान्यापर्यंत येण्यास असमर्थ आहे याबद्दल खात्री करून घेईल व मग विमेदाराच्या घरीं जाईल.

गरज पडल्यास राज्य सरकार विमेदारांची तपासणी करण्यासाठी व त्यांना औषधोपचार करण्यासाठी वेगळीं इस्पितळें किंवा वैद्यकीय संस्था स्थापन करूं शकेल, अथवा सरकारच्या, स्थानिक संस्थेच्या अगर खाजगी नियंत्रणाखालील इस्पितळें व वैद्यकीय संस्था यांत कांहीं खाटा राखून ठेवूं शकेल.

योजनेंतील वैद्यक व्यवसायींकडून रोग्यास पुरेशीं औषधें व ड्रेसिंगचें साहित्य वगैरे मोफत पुरविण्याची या नियमांत तरतूद करण्यांत आली आहे. औषधाच्या बाटल्यासाठीं डिपॉझिट घेण्यांत येईल आणि त्या बाटल्या परत केल्यावर डिपॉझिट परत देण्यांत येईल.

### देखरेख आणि नियंत्रण

उपरोक्त नियमानुसार कारभार पाहण्यासाठी एक मेडिकल सर्व्हिस कमिटी स्थापन करण्यांत यावयाची असून या समितीचा अध्यक्ष सरकार नियुक्त करील. शिवाय त्यांत कामगारांचे एक-दोन प्रतिनिधी, तितकेच वैद्यक व्यवसायी, कॉर्पोरेशनचा एक मेडिकल रेफरी आणि सर्जन जनरलनें नियुक्त केलेला एक इसम यांचा समावेश करण्यांत येईल. समितींत स्त्री-सभासद नसेल तर राज्य सरकार आणखी एक सभासद नियुक्त करील. पूर्ण वेळ काम करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याला समितीचे चिटणीस म्हणून नेमण्यांत येईल. एकादा सभासद लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिला तर त्याचें सभासदत्त्व रद्द होईल. तथापि कांहीं अपरिहार्य कारणामुळें सदरहु सभासद सभांना हजर राहूं शकला नाहीं अशी राज्य सरकारची खात्री पटल्यास सरकार त्याला परत समितीचा सभासद करून घेईल.

योजनेंतील वैद्यक व्यवसायीनें औषधोपचार करण्याच्या बाबतींत अगर आपल्या इतर कामांत हलगर्जीपणा दाखविला तर त्याबाबत मेडिकल सर्व्हिस कमिटीनें चौकशी करतांना कोणती पद्धत वापरावयाची हें नियमांत नमूद केलें आहे. विमा योजनेखालील वैद्यक व्यवसायीनें करावयाच्या कामाबाबत अगर वैद्यकीय मदत देण्याबाबतच्या कारभाराबाबत ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडिकल ऑफिसर, स्थानिक वैद्यकीय समितीच्या इच्छेनुसार उपरोक्त समितीचा विचार घेईल.

वैद्यक व्यवसायींच्या निष्काळजीपणाबाबत मेडिकल सर्व्हिस कमिटीनें चौकशी केल्यानंतर त्या वैद्यक व्यवसायीनें किती रोग्यांना औषधोपचार करावयाचा याबाबत सर्जन-जनरल मर्यादा घालूं शकतील. तसेंच एकाद्या वैद्यक व्यवसायीनें आपल्या कामांत निष्काळजीपणा केला आहे असें दिसून आल्यानंतर रोग्यावर उपचार करण्यासाठी जो पैसा खर्च झाला असेल तितकी रक्कम सर्जन-जनरल सदरहू वैद्यक व्यवसायीच्या मुशाहिऱ्यांतून वजा करूं शकेल किंवा ती देण्याचें लांबणीवर टाकूं शकेल किंवा सदरहू वैद्यक व्यवसायीचें नांव यादींतून काढून टाकूं शकेल.

"निष्काळजीपणा" या शब्दाचा पुढीलप्रमाणें अर्थ लावण्यांत आला आहे. रोग्यावर उपचार करतांना जरूर तें कौशल्य न वापरणें आणि जरूर तितकी काळजी न घेणें, आवश्यक तेव्हां रोग्याला भेट देण्याची टाळाटाळ करणें, रोग्याला जरूर तें औषध न पुरविणें आणि नोकरीबाबतच्या अटीनुसार वैद्यक व्यवसायीच

रोग्यावर जे उपचार करतां येत नाहींत अशा उपचाराबाबत रोग्याला सल्ला देण्याचें टाळणें.

विमा योजनेसाठील वैद्यक व्यवसायींची एक स्थानिक वैद्यकीय समिति स्थापन करण्याबाबत नियमांत तरतूद करण्यांत आली आहे. तसेंच या योजनेसाठीं आलेल्या कामगारांनीं कसें वागावें याबाबतहि नियमांत कांहीं अटी घालून देण्यांत आल्या आहेत. सदरहू अटींनुसार विमेदार रोग्यानें वैद्यक व्यवसायीस आपलें ओळखपत्र दाखविलें पाहिजे. डॉक्टरानें दिलेल्या सूचना त्यानें पाळल्या पाहिजेत. त्यानें डॉक्टरकडे गैरवाजवी मागण्या करतां कामा नये अगर अगदीं आणीबाणीचे प्रसंग वगळल्यास रात्रीं ८ ते सकाळीं ९ पर्यंत वैद्यक व्यवसायीला घरीं बोलावतां कामा नये. ज्या वेळेला आणि ज्या ठिकाणीं वैद्यक व्यवसायीनें औषधोपचारासाठीं बोलावलें असेल त्या जागीं हजर राहिलें पाहिजे. ज्या दिवशीं वैद्यक व्यवसायीला घरीं बोलवावयाचें असेल त्या दिवशीं अगदीं आवश्यक असेल तरच त्याच्या घरीं सकाळीं १० पूर्वी तशी सूचना दिली पाहिजे आणि कायद्यानुसार जे उपचार मिळण्याचा त्याला हक्क नाहीं अशा उपचारांची त्यानें मागणी करतां कामा नये.

### औषधांची यादी

वैद्यकीय मदत देण्याची पद्धत योग्य प्रकारें अगर कार्यक्षमरीत्या अंमलांत येत नाहीं अशी सरकारची खात्री पटल्यास सदरहू पद्धत पूर्णपणें अगर कांहीं प्रमाणात बंद ठेवण्याचा सरकारला नियमानुसार अधिकार असून या बाबतींत सरकार स्वतःला योग्य वाटेल अशी वेगळी व्यवस्था करूं शकेल.

नियमाला जोडलेल्या परिशिष्टांत आणि तक्त्यांत ड्रेसिंगचें साहित्य, निरनिराळ्या लसी, अँटिबायोटिक्स, व्हिटॅमिनचे पदार्थ, एन्डॉक्रिनल प्रिपरेशन्स, इंजेक्शन्स, सल्फाड्रग्ज, अँटी ॲमेबिक ड्रग्ज, किरकोळ इंजेक्शन्स, टॅबलेटस्, वगैरे मालाची आणि १६ आयुर्वेदिक औषधांची यादी देण्यांत आली आहे.

### दि मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल व्हिलेज सॅनिटेशन फंड

ग्रामीण भागांत स्वच्छता राखण्यासाठी व वाढविण्यासाठी वरील फंडांतून दरसाल प्रत्येकी १५० रु. पर्यंत ग्रँट देण्यांत येतात. अशा प्रकारचें काम करणाऱ्या व मदतीची आवश्यकता असणाऱ्या संस्थांनीं खालील पत्त्यावर आपले अहवाल पाठवून अर्जाचा नमुना मागवावा:—सोशल सर्व्हिस लीग, सँडहर्स्ट रोड, मुंबई ४.

## भारत सरकारीं व्याजाचीं देणीं व व्याजाचीं येणीं

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| | १९३८–३९ | १९४६–४७ | १९५३–५४ | १९५४–५५ बजेट |
|---|---|---|---|---|
| **ज्यावर व्याज द्यावें लागतें अशीं देणीं** | | | | |
| **भारतांत** | | | | |
| १ कर्जे | ४३७,८७ | १,५२९,७६ | १,३६६,०५ | १,३९१,२९ |
| २ ट्रेझरी बिलें, वेज अँड मीन्स अडव्हान्सेस, ट्रेझरी डि. रिसीटस | ४६,३० | ७९,२० | ४०५,२९ | ६५५,२९ |
| ३ बचतयोजना | १४१,४५ | ७३,२० | ४५४,८७ | ५००,१० |
| ४ घसारा व रिझर्व्ह फंड | २७,३४ | १४३,९७ | १७१,९६ | १५७,८६ |
| ५ इतर | ८३,६८ | २९७,०३ | १५५,६८ | १६८,४४ |
| एकूण | ७३६,६४ | २,१२३,१५ | २,५५३,८५ | २,८७२,९८ |
| **इंग्लंडमध्यें** | | | | |
| १ कर्जे | ३९६,५० | १२,२२ | १,१३ | ७५ |
| २ इतर | ७२,६२ | ४६,५२ | २७,८४ | २६,६२ |
| एकूण | ४६९,१२ | ५८,७४ | २८,९७ | २७,३७ |
| डॉलरमधील कर्जे | ... | ... | १११,८० | ११३,३६ |
| एकूण देणीं | १,२०५,७६ | २,१८१,८९ | २,६९४,६२ | ३,०१३:७१ |
| **ज्यावर व्याज मिळतें अशीं येणीं** | | | | |
| १ रेल्वेजना भांडवल | ७२५,२४ | ८०८,१६ | ८७५,१६ | ९०९,१४ |
| २ इतर व्यापारी खात्यांना भांडवल | २७,४२ | ४८,६३ | ८८,२४ | १०५,२४ |
| ३ व्यापारी उपक्रमांत गुंतवण | ... | ... | २७,१४ | ४८,१५ |
| ४ राज्यांना कर्जे | १४३,९९ | ७३,७८ | ४८३,७८ | ६६७,०० |
| ५ बर्मा व पाकिस्तानकडून येणें | ४९,७३ | ४८,७५ | ३४८,१५ | ३४८,१५ |
| ६ ब्रि. सरकारकडे ठेवी | ... | २२,४४ | ४,३३ | ३,१८ |
| ७ स्टर्लिंग पेन्शनांसाठी ॲन्युइटीजची खरेदी | ... | ... | १७८,०३ | १७०,९८ |
| **व्याज देणारें एकूण येणें** | ९४६,३८ | १,००१,१६ | २,००३,८३ | २,२५१,८४ |
| ८ रोख व रोखे | ३०,१० | ५१३,७६ | ७०,४४ | ७०,७१ |
| ९ वरील जिंदगीपेक्षा ज्यास्त भरणारें ( व्याज द्यावें लागणारें ) देणें | २२९,०८ | ८६६,६७ | ६२०,३५ | ६९१,१६ |

### बँकेंतील जॉइंट नांवानें ठेवी व इस्टेट-ड्यूटी कायदा

" बँकेमध्यें दोघांच्या नांवानें जॉइंट खातें आहे. त्या दोघांपैकी एक मरण पावला, तर तें खातें उरलेल्यानें चालविण्यास एस्टेट ड्यूटीच्या अंमलबजावणीच्या दृष्टीनें कांहीं प्रत्यवाय येतो काय?" अशी चौकशी सुरत पीपल्स को. बँक लि. नें सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूकडे केली. चौकशी व आलेलें उत्तर खाली देण्यांत येत आहे:—

**बँकेचे प्रश्नः**—( १ ) अ आणि ब ह्यांच्या जोड नांवानें खातें आहे. त्यांपैकी कोणासहि व त्यांपैकी कोणींहि मृत्यु पावल्यास उरलेल्याला पैसे काढतां येतील. अ मृत्यू पावला. एस्टेट-ड्यूटी क्लिअरन्स सर्टिफिकेट बँकेनें मागितलें पाहिजे काय ? तें नसतांना ब ला पैसे काढतां येतील काय ?

( २ ) अ आणि ब ह्यांच्या जोडनांवानें खातें आहे. दोघांनीं मिळून किंवा त्यांपैकी कोणाच्याहि मृत्यूनंतर उरलेल्याला खातें चालविण्याचा अधिकार आहे. अ आणि ब पैकी एकजण मृत्यु पावला. एस्टेट ड्यूटी क्लिअरन्स सर्टिफिकिकेट बँकेनें न मागतां उरलेल्याला बँक पैसे देऊं शकेल काय ?

**बोर्ड ऑफ रेव्हेन्यूचें उत्तरः**—जॉइंट अकाउंटच्या अटीप्रमाणें बँकेनें पैसे देण्यास एस्टेट ड्यूटी कायद्याची आडकाठी नाहीं. नेहमींच्या कायद्याप्रमाणें, कायदेशीर वारसास पैसे देण्यासहि हरकत नाहीं.

---

### दि पेण को. अर्बन बँक लि., पेण

जुन्या सभासदांनीं ज्यास्त शेअर घेतल्यामुळें व नवीन होणाऱ्या सभासदांनीं प्रत्येकी ज्यास्त शेअर घेतल्यामुळें ११ सभासद कमी होऊनहि शेअर भांडवल १,१७५ रु. नें वाढलें. कोरमच्या अभावीं व्यवस्थापक मंडळाची एकहि सभा बरखास्त करावी लागली नाहीं व सर्व ठराव एकमतानें पास झाले. कर्जवसुलीच्या सावधगिरीमुळें या वर्षअखेर थकबाकीदारांचे यादींत नवीन भर पडली नाहीं, आणि यापुढें थकबाकीबाबत धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. मॅनेजिंग डायरेक्टर व ऑनररी ऑडिटर ह्यांनीं कारकुनांच्या अस्थिर परिस्थितींतहि बँकेच्या कामांत कोठेंच उणीव पडूं दिली नाहीं, असा अहवालांत उल्लेख आहे आणि कारकुनांच्या व शिपायांच्या उत्साही, जबाबदारीच्या कामगिरीचा गौरव करण्यांत आला आहे. बँक लहान असली, तरी ती आदर्श होण्याच्या मार्गावर आहे आणि अर्बन सहकारी बँक खऱ्या अर्थानें यशस्वी होण्यास जरूर ती परिस्थिति व वृत्ति असल्याचें अहवालावरून दिसून येतें. अहवालाचे वर्षी बँकेस ३,५५५ रु. नफा होऊन ६% दरानें डिव्हिडंड देण्यांत आलें. ( चेअरमन : नारायण यशवंत नेने. मॅ. डायरेक्टरः रामकृष्ण गोविंद भावे )

---

### दि टाटा ऑइल मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५४ अखेर संपलेल्या वर्षी साबण, ग्लिसरीन, तेलें, सौंदर्यवर्धक जिन्नस व सुगंध इत्यादींचें मिळून ४,३५,२०,१७९ रुपयांचें उत्पादन केलें. वहातुकीचें भाडें, कमिशन, डिस्कौंट, इत्यादींसाठीं ३६,६७,७६५ रु. खर्ची पडले. खर्च, घसारा, इत्यादि वजा जातां ५,९६,६६१ रु. निव्वळ नफा उरला. मॅ. एजंटांना २,५३,९५४ रु. कमिशन मिळालें. डायरेक्टरांना फीचें एकूण फक्त २,१०० रु. दिले. "पकाव" ची विक्री अहवालाचे वर्षी दुप्पट झाली. कपडे धुण्याचा साबणहि अधिक खपला. अंगाला लावण्याच्या साबणासहि चांगली मागणी होती. कोकोजेमला पूर्वीप्रमाणें मागणी राहिलेली नाहीं.

### अर्वाचीन आंतरराष्ट्रीय ग्रंथांचें सार्वजनिक प्रदर्शन

या प्रदर्शनाचा प्रथमदिन-समारंभ पुणें बृहन्नगरपालिकेचे महापौर, श्री. शं. द. उरसळ यांच्या अध्यक्षतेखाली कॉमन्वेल्थ व्याख्यानशाळेंत झाला. त्यावेळीं श्री. उरसळ म्हणाले, कीं नागरी जीवन सुधारावयासाठींहि ग्रंथालयांची आवश्यकता फार आहे. म्हणून या समारंभास व प्रदर्शनास मी फार महत्त्व देतों. त्यांनीं महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या कार्याची प्रशंसा केली व संग्रहालयासारख्या संस्थांचें महत्त्व प्रतिपादन केलें. श्री. पटवर्धन यांनीं प्रदर्शनांत मांडलेल्या ग्रंथांची माहिती सादर केली. या प्रदर्शनांत एक ४५० पानांचा एक तोळा वजनाचा ग्रंथ मोठे दिसणाऱ्या कांचेखालीं मांडलेला आहे. एक पुस्तक ४५ पौंड किंमतीचें आहे व तें एका संग्रहालयाचा सचित्र कॅटलॉग आहे. त्याचें बायंडिंग अत्युत्तम आहे. श्री. घारपुरे यांनीं ग्रंथालयाचे संवर्धनाचे इतिहासांतील ठळक ठळक महत्त्वाच्या संघटना सांगितल्या. पुढें लायब्ररी ऑफ काँग्रेस ही वॉशिंग्टन येथील जगप्रसिद्ध वाचनालयाची फिल्म दाखविण्यांत आली. प्रदर्शनांत १०००–१५०० ग्रंथ मांडिले आहेत. प्रदर्शन तीन महिने खुलें राहणार आहे. प्रदर्शनास दर नाहीं.

---

### डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, पुणें

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स या संस्थेचे खालील विद्यार्थी इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौन्टसच्या मे १९५४ मधील फर्स्ट-पार्ट व सेकंडपार्ट परीक्षेमध्यें यशस्वी झाले.

**फर्स्टपार्ट**—( १ ) के. एस्. चेरियन. ( २ ) पी. एम्. देशपांडे ( ३ ) सी. आय. वारुघेसी.

**सेकंडपार्ट**—के. सुब्रमनीयम्.

---

### युनायटेड मर्कंटाइल बँक ( आसाम ) लि.

युनायटेड मर्कंटाइल बँक ( आसाम ) लि. ला रिझर्व्ह बँकेनें परवाना नाकारला आहे. ह्या बँकेच्या ताज्या ताळेबंदांतील आंकडे खालीलप्रमाणें आहेत:— वसूल भांडवल ३ लक्ष ५ हजार रु., रिझर्व्ह फंड शून्य रु., एकूण ठेवी ३० हजार रु., रोख शिल्लक ८ हजार रु., इतर बँकांत शिल्लक शून्य रु., कर्जे ३ लक्ष, २६ हजार रु., सरकारी रोखे ५ हजार रु.

---

## श्री. शंकरराव ओगले ह्यांचें अभिनंदन

ओगलेवाडी येथें श्री. शंकर प्रभाकर ओगले, संचालक, ओगले ग्लास वर्क्स लि. यांचे वयास ६० वर्षे पूर्ण होऊन ६१ वें वर्ष लागलें म्हणून त्यांच्या आप्तेष्ट मित्रांनीं दिनांक २७।७।५४ ला त्यांचा हा वाढदिवस वैदिक धर्मशास्त्रानुसार मोठ्या उत्साहानें साजरा केला. दिल्ली, कलकत्ता, मद्रास, मुंबई, म्हैसूर, नागपूर, त्रावणकोर इत्यादि ठिकाणांहून त्यांचेवर अभिनंदनपर तारा नि पत्रें यांचा वर्षाव झाला. रात्रौ मेळे, भजन, गायन आणि नाट्यप्रवेश यांचा कार्यक्रम फार बहारीचा झाला.

स्वदेशी भक्तीनें प्रेरित होऊन स्वार्थत्यागपूर्वक ज्यांनीं कारखानदारीचा ध्यास घरला, अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या गेल्या एक-दोन पिढ्यांतील व कुटुंबांतील कांहीं मोजक्या व्यक्तींपैकी श्री. शंकरराव हे एक प्रमुख आहेत. त्यांच्या प्रस्तुत वाढदिवसाचे शुभप्रसंगीं आम्हीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ महाराष्ट्रीय कारखान्यांना दीर्घकाळ लाभावा असें चिंतितों.

## सिनेमा नटींचा योगाभ्यास

सिनेमा नट अगर नटी यांतील सेटाडू यांच्या प्रकृतीला इतर व्यवसायांतील लोकांच्या प्रकृतीच्या व शरीरसौष्ठवाच्या मानानें अधिक आर्थिक महत्व असतें. त्यामुळें त्यांच्यांतील कांहीं लोक त्यांच्या ह्या भांडवलाला काळजीपूर्वक जपत असतात. कारण, प्रकृति आणि शरीर–सौष्ठव ह्यावरच त्यांची अर्थार्जनाची क्षमता अवलंबून असते. मूक चित्रपटांतील जमान्यांत अमेरिकन रजतपटावर ज्या अनेक नटी होऊन गेल्या त्यांत ग्लोरिओ स्वान्सन नांवाची एक नटी आहे. तिचें वय सध्यां ५५ वर्षांचें आहे. तरीपण ती अजूनहि चित्रपटांत काम करीत असते. "सनसेट बूलव्हर्ड" ह्या चित्रपटांत तिनें नुकतीच एक भूमिका केली आहे. ही नटी योगाभ्यास करत असते. ती ह्या वयांतहि चांगलीच आकर्षक दिसते आणि काम करण्याचा तिचा उत्साहहि लक्षांत येण्यासारखा आहे. कांहीं सोपीं योगासनें करण्यामुळें तिला हा फायदा झाला आहे. शरीराची कार्यक्षमता व सौष्ठव चांगलें रहावें म्हणून ती योगासनाचा व्यायाम नियमित करीत असते. तिच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांना आतां हें माहीत झालें असल्यानें शीर्षासन अगर सर्वांगासन करतांना तिला पाहिल्यास त्यांना आश्चर्य वाटत नाहीं. कधीं कधीं पद्मासन घालून ध्यानस्थ बसण्याचाहि सराव ती करीत असते. योगासनें करण्यासाठी तिनें कांहीं संन्यस्ताचा वेष धारण केलेला नाहीं. गुढग्यापर्यंतच येणारी अर्धी विजार आणि ब्लाऊज ह्या वेषांत आसनें चांगलीं करतां येतात असा तिचा अनुभव आहे. गोरिआ स्वान्सन आणखी एका चित्रपटांत काम करण्याचा विचार करीत आहे. चित्रपटाचें काम फ्रान्समध्यें चालणार आहे. अजून नक्की कांहीं ठरलेलें नाहीं. पण ऑरसन वेल्सबरोबर ती काम करणार आहे अशी वार्ता लोकांच्या तोंडीं आहे.

---

### झगडा—"स्ट्राइफचा अनुवाद"

(लेखक: श्री. गो. द. अभ्यंकर, पृ. सं. ८२. किं. १॥ रु.)

वाढत्या बेकारीचा आणि लोकसंख्येचा प्रश्न सोडवावयाचा तर औद्योगीकरणाची कास धरल्याखेरीज तरणोपाय नाहीं याची जाणीव देशांतील पुढारी आणि विचारवंत यांना होऊं लागल्याचीं शुभचिन्हें दिसत आहेत.

उद्योग–धंदे किंवा व्यापार–उद्दीम यांवर वाङ्मय मोजकें असून ललितवाङ्मयांत त्यांचा उल्लेख क्वचित्च आढळतो. सिनेमा–नाटकांत प्रसंगीं गिरणीमालक व मजूर पात्रें असतात तीं साधारणतः मग्रूर मालक हा नायिकेचा पिता आणि ध्येयवादी तरुण नायक या भूमिकेंत!

उद्योग–धंदे, व्यापार–उद्दीम यांची सांगोपांग चर्चा व्हावी, त्यांतील निरनिराळ्या प्रश्नांवर प्रकाश पडावा, अशी विचारसरणी असलेली मंडळी श्री. गो. द. अभ्यंकर यांनीं लिहिलेल्या 'झगडा' नाटकाचें सहर्ष स्वागत करतील.

कारखान्याचे संचालक, मालक, व्यवस्थापक, इतर अधिकारी मंडळी, तसेंच कामगार आणि त्यांचे पुढारी यांच्या मनोव्यापारांची प्रसंगाप्रसंगानें केलेली उकल हळुवार पण मानवी स्वभावाला अनुसरून असल्यानें नाटक विलक्षण वास्तववादी झालें आहे.

मात्र, गॉल्सवर्दीच्या स्ट्राइफ या नाट्यकृतीच्या या मराठी रूपान्तरांत दुसऱ्या महायुद्धानंतरच्या प्रगत जनमताची दखल घेण्यांत आली असती, तर अधिक बरें झालें असतें.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जें देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ माहिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.